माहितीचा अधिकार
... माहितीची प्रत
(स्वाक्षरी)
जन माहिती अधिकारी तथा (पदनाम).......
कार्यालयाचे नाव.......
दिनांक :- 29/11/2016

# महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२

१. **संक्षिप्त नाव**

या नियमास "महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२" असे म्हटले जाईल.

२. **प्रारंभिक आणि प्रयुक्ति**

ही नियमावली २१ जून, १९८२ रोजी अंमलात येईल आणि ज्या संबंधी नियम करणे हे शासनाच्या अखत्यारात येते अशी सर्व पदे, संवर्ग व सेवा यामधील शासकीय कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता तदनंतर या नियमावलीच्या तरतुदीनुसार विनियमित होईल. परंतु कोणतीही विशिष्ट पदे, संवर्ग किंवा सेवा यामधील जेष्ठतेचे विनियमन करण्यासाठी कोणतेही वेगळे नियम किंवा आदेश विहीत केले असतील त्याबाबतीत, अशी पदे धारण करणाऱ्या व्यक्तींच्या किंवा अशा संवर्गातील अथवा सेवेतील व्यक्तींच्या ज्येष्ठतेचे विनियमन असे वेगळे नियम किंवा आदेश यानुसार करण्यात येईल.

३. **व्याख्या :** या नियमावलीत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) **सक्षम प्राधिकारी** याचा अर्थ कोणत्याही पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी,

(ब) **आयोग** याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(क) कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यासंबंधात **अखंड सेवा** याचा अर्थ एखाद्या व्यक्तीने त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत प्रत्यावर्तन न होता अखंडपणे केलेली सेवा.

परंतु एखादी व्यक्ती या नियमांच्या तरतुदी अन्वये नेमणुकीच्या मानीव तारखेपासून एखाद्या पदावर, सवंर्गात किंवा सेवेत अखंडपणे स्थानापन्न असेल त्या बाबतीत अशा व्यक्तीने अशा मानीव तारखेपासून अखंड सेवा केलेली आहे असे मानले जाईल.

(ड) **मानीव तारीख** याचा अर्थ नियम ५ च्या तरतुदींनुसार शासकीय कर्मचाऱ्यास नेमून दिलेली तारीख.

(इ) कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यासंबंधात **थेट भरती केलेली व्यक्ती** याचा अर्थ त्या पदावर संवर्गात किंवा सेवेत नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेली व्यक्ती,

Scanned by CamScanner

केलेली असेल तर, पहिल्या भागात बिनशर्त निवड झालेल्याची नावे अंतर्भूत असतील व दुसऱ्या भागात काही शर्तीवर निवड झालेल्यांची नावे असतील. पहिल्या भागात समाविष्ट झालेल्या सर्व व्यक्तींचा क्रम दुसऱ्या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल.

परंतु निवड सूचीतील नावे ज्या क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधीत शासकीय कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठताक्रम त्यांच्या या सुधारीत क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येऊन निर्धारीत केला जाईल.

(क) बदली झालेला शासकीय कर्मचारी ज्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत तो बदली झालेला आहे त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेने त्याची ज्येष्ठता, त्याची जेथे बदली झाली त्या पदाचा, संवर्गाचा किंवा सेवेचा वर्ग आणि वेतनमान, तेथील त्याचा सेवाकाल आणि त्याच्या बदलीस कारणीभूत झालेली परिस्थिती यथायोग्यपणे लक्षात घेऊन सक्षम प्राधिकारी निर्धारित करील.

(३)(अ) थेट भरतीने नेमणूक झालेला निवड यादीवरील उमेदवार नेमणुकीच्या आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत रुजू झाला असेल किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने वाढवून दिलेल्या मुदतीत रुजू झाला असेल तर अशा उमेदवाराची ज्येष्ठता, त्याच्या निवड यादीतील पसंती क्रमानुसार ठरविली जाईल. म्हणजेच अशा प्रकरणी नेमणुकीच्या ठिकाणी प्रत्यक्ष हजर होण्याची तारीख विचारात न घेता गुणवत्ता यादीतील अनुक्रमाचा विचार होवून ज्येष्ठता ठरविली जाईल.

उदाहरणार्थ : पदाचे नाव - तहसीलदार नेमणुकीच्या आदेशाची तारीख - १/५/९४

| उमेदवाराचे नावे | निवड यादीतील क्रमांक | पदावर हजर होण्याची तारीख | ज्येष्ठता ज्या क्रमाने ठरविली जाईल तो क्रमांक |
|---|---|---|---|
| अ | १ | २८/५/९४ | १ |
| ब | २ | १५/५/९४ | २ |
| क | ३ | १/७/९४ | ३ |
| ड | ४ | ३/५/९४ | ४ |

टीप : क उमेदवाराच्या बाबतीत प्राधिकाऱ्याने हजर होण्याची मुदत रीतसर वाढवून दिली आहे.

(ब) पदोन्नतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांची ज्येष्ठता, निवड सूचीमधील पसंतीक्रमानुसार ठरविली जाईल.

Scanned by CamScanner

माहितीचा अधिकार अधिनियम, अंतर्गत देण्यात आलेली माहिती

## ज्येष्ठतेसंबंधी महत्वपूर्ण विवेचन

प्रत्येक कर्मचाऱ्याने (यात अधिकारी आलेच) खालील बाबींकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे. कारण त्यांचा संबंध आपल्या दर्जाशी (status) व आर्थिक बाबींशी आहे. जराही दुर्लक्ष झाले वा नियमांच्या अज्ञानामुळे चूक झाली तर मनस्ताप होतो, आर्थिक नुकसान होते आणि काही वेळा आयुष्यभर पश्चाताप करावा लागतो. या महत्वपूर्ण बाबी अशा -

१. नेमणूक
२. ज्येष्ठता
३. गोपनीय अहवाल
४. पदोन्नती

या प्रकरणात प्राधान्याने विचार करायचा आहे तो ज्येष्ठतेचा. गोपनीय अहवाल व पदोन्नतीचा विचार स्वतंत्र प्रकरणात झाला आहे. ज्येष्ठता ठरविताना काही तत्वे पाळावी लागतात. काही निकष ठरलेले आहेत. एका तपापूर्वी ज्येष्ठतेचे निकष वेगळे होते. १९९० मध्ये ज्येष्ठतेच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने अभियंत्यांच्या संघटनेने दाखल केलेल्या अपील प्रकरणी दिलेला निकाल ऐतिहासिक व म्हणून महत्वपूर्ण ठरला. या निकालानंतर ज्येष्ठतेसंबंधी प्रशासनात काही बदल घडले, नव्या दिशेने विचार होऊ लागला. त्यानंतर अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट झाली. विक्रीकर कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठतेसंबंधीचा प्रश्नही थेट सर्वोच्च न्यायालयात गेला. हे सगळेच निकाल ज्येष्ठतेच्या प्रश्नाला योग्य वळण लावणारे ठरले आणि न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली. या तत्वांच्या आधारे शासनाने ज्येष्ठतेसंबंधी महत्वाच्या सूचना वेळोवेळी पारित केल्या. ज्येष्ठतेसंबंधी विचार करताना खालील बाबी विचारात घेणे आवश्यक ठरते -

१. थेट भरतीने म्हणजेच नामनिर्देशनाद्वारा (By direct recruitment/by nomination) व पदोन्नतीने होणाऱ्या नेमणुकांबाबत निकष
२. थेट भरतीचे व पदोन्नतीचे प्रमाण (quota system) निश्चित झाले असेल तर त्याबाबत ज्येष्ठता ठरविण्याचे निकष
३. थेट भरतीने नेमणुकीचे व पदोन्नतीचे प्रमाण निश्चित झाले नसेल तर त्याबाबत ज्येष्ठता ठरविण्याचे निकष
४. अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांना बिंदू नामावलीनुसार वेगवर्धन पदोन्नती दिल्यानंतर त्यांची ज्येष्ठता निश्चित करण्याचे निकष
५. तात्पुरत्या स्वरुपावर नेमण्यात आल्यानंतर सेवेत कायम करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याची ज्येष्ठता ठरविण्यासंबंधीचे निकष
६. थेट भरतीने भरावयाच्या पदांवर जरूर त्या प्रमाणात नेमणुका झाल्या नसतील, परंतु

Scanned by CamScanner

पदे पदोन्नतीने भरण्यात आली असतील तर त्याबाबत ज्येष्ठता निश्चित करण्या संबंधीची तत्वे.

७. पदकपातीमुळे वा आस्थापना कमी झाल्यामुळे सेवेतून कमी झालेले परंतु अन्य विभागात सामावून घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठतेचे निकष

८. पदकपातीमुळे त्याच विभागात सामावून घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ठरविणे.

९. शासनाच्या धोरणानुसार वा भरती नियमातील तरतुदीनुसार सामावून घेण्यात आलेल्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ठरविणे.

१०. आंतरजिल्हा वा आंतरविभाग स्तरावरील बदल्यांमुळे नेमणुका झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ठरविणे.

११. प्रतिनियुक्तीवर वा तात्पुरत्या बदलीवर नेमणुका झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ठरविण्याचे निकष

१२. गंभीर रोगामुळे सेवेतून मुक्त झालेल्या परंतु नंतर पुनर्नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ठरविणे.

१३. शिक्षा झाल्यामुळे खालच्या पदावर नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ठरविणे.

१४. एकापेक्षा अधिक अतिरिक्त कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात आल्यानंतर त्यांची ज्येष्ठता ठरविणे.

१५. निवड मंडळ वा राज्य निवड आयोगाच्या शिफारशीनुसार सामावून घेण्यात आलेल्या / नेमण्यात आलेल्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ठरविणे.

१६. अतिरिक्त कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात आल्यानंतर त्यांना पदकपातीमुळे कमी करण्यात आले व नंतर पुनर्नेमणुका देण्यात आल्या तर त्यांच्या ज्येष्ठतेचे निकष ठरविणे.

१७. निलंबीत / ज्यांच्याविरुध्द खाते चौकशी चालू आहे / ज्यांना बडतर्फीनंतर पुनर्नेमणूक देण्यात आली त्यांची ज्येष्ठता ठरविणे.

## ज्येष्ठतेसंबंधी स्पष्टिकरण

१. न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यापूर्वी खालील मुद्यांच्या आधारे ज्येष्ठता निश्चित केली जात होती.

अ) नेमणुकीनंतर हजर होण्याची तारीख

ब) दोन उमेदवारांची हजर होण्याची तारीख सारखीच असेल तर वयाने ज्येष्ठ असलेली व्यक्ती सेवेतही ज्येष्ठ ठरवली जात असे.



Scanned by CamScanner

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहितीची प्रत
(स्वाक्षरी)
जन माहिती अधिकारी तथा (पदनाम)....
कार्यालयाचे नाव....
दिनांक - 29 / 11 / 2016

क) सेवेत सर्वप्रथम कायम झालेली व्यक्ती ज्येष्ठतेत वरच्या क्रमांकावर दाखवली जात असे. सेवेत आधी लागलेली व्यक्ती कायम करण्यात आली नाही तर तिच्यापेक्षा कनिष्ठ परंतु कायम करण्यात आलेली व्यक्ती सेवेत ज्येष्ठ ठरवली जात असे व तिला पदोन्नतीचा लाभ आधी दिला जात असे.

ड) थेट भरतीने व पदोन्नतीने नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांबाबत वेगळे निकष न लागता हजर होण्याची तारीख ज्येष्ठता ठरवताना ग्राह्य धरली जात असे.

सर्वोच्च न्यायालयाने ज्येष्ठतेसंबंधी जे महत्वपूर्ण निर्णय दिले व मार्गदर्शक तत्वे घालून दिली त्यामुळे सुधारित निकष अस्तित्वात आले.

## सुधारित निकष

१. **ज्येष्ठता नेमणुकीच्या तारखेपासून :** नामनिर्देशित अभियंतांची संघटना वि. महाराष्ट्र राज्य प्रकरणी दिनांक २ मे. १९९० रोजी दिलेल्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, कर्मचाऱ्याची एकदा का नियमानुसार राज्य सेवेत नेमणूक झाली तर त्याची ज्येष्ठता नेमणुकीच्या तारखेपासून ग्राह्य धरण्यात यावी. कर्मचारी सेवेत कायम आहे वा नाही हा मुद्दा विचारात घेऊ नये. या ठिकाणी नेमणुकीच्या तारखेपासून याचा अर्थ हजर झाल्याची तारीख असा घेऊ नये. याचा अर्थ प्रारंभिक नेमणूक करताना जो गुणानुक्रम असेल (order of merit) त्यानुसार ज्येष्ठता ठरविण्यात येईल. या निकालामुळे आधीची प्रकरणे मात्र बाधित होणार नाहीत.

२. **नामनिर्देशित उमेदवारांची ज्येष्ठता :** हजर होण्याची तारीख हा ज्येष्ठतेचा मूलाधार राहिलेला नाही. निवड मंडळाकडून वा निवड आयोगाकडून ज्यांची निवड केली जाते व त्यानंतर ज्यांच्या नेमणुका केल्या जातात त्यांच्या बाबतीत निवड यादीतील गुणानुक्रम हा ज्येष्ठतेसाठी मूलाधार धरला जातो. मात्र नेमणुकीच्या अटीनुसार विहीत मुदतीत हजर होणे महत्वाचे असते. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा ज्येष्ठता नियम)

३. **पदोन्नत कर्मचाऱ्याची ज्येष्ठता :** पदोन्नती समितीकडून निवड झालेल्या उमेदवारांची वरिष्ठ पदावर ज्येष्ठता ठरवताना त्यांची मूळ ज्येष्ठता डावलली जाणार नाही. ज्या उमेदवारांची पात्रतेच्या अभावी (subject to fitness for promotion / who is considered unfit for promotion) पदोन्नतीच्या पदासाठी निवड करण्यात आली नाही, परंतु कालांतराने पात्र आढळून आल्यावर त्याची निवड करण्यात आली व पदोन्नतीच्या पदावर त्यास नेमण्यात आले तरी त्याच्यापेक्षा आधी पदोन्नतीने नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वरिष्ठ पदावरील ज्येष्ठतेला बाधा येणार नाही.

Scanned by CamScanner